**नियमित दिवाणी दावा क्र. १११/२०२४**
**श्री सुनील शंकर सावर्डेकर**
**वि.**
**श्री अनंत शंकर सावर्डेकर**

## नि.१०३ खालील आदेश

प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रकिया संहिता,१९०८ मधील आदेश ६ नियम १७ प्रमाणे कैफियत व प्रतिदाव्यामध्ये दुरुस्ती होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. त्यांचे थोडक्यात कथन असे की, प्रतिवादी क्र.३ चंद्रभागा शंकर सावर्डेकर यांनी दावा मिळकत गट क्र.१४३ मधील त्यांचा हिस्सा नोंदणीकृत खरेदी दस्त क्र.६४३/२०२५ ने या प्रतिवादी क्र.१ यास दिलेला असल्यामुळे त्यांचा दावा मिळकतीत हिस्सा वाढला आहे. म्हणून कैफियत व प्रतिदाव्याच्या परिच्छेद क्र.८ मधील मजकूरापुढे सदरचा मजकूर समाविष्ट करावयाचा आहे.

३. मुळ वादी तर्फे विधीज्ञानी या अर्जास म्हणणे दाखल केल असून तो अर्ज पुर्णपणे खोटा व खोडसाळ असल्याने नामंजुर करण्यास विनंती केली. त्यांनी युक्तीवादादरम्यान असे कथन केले की, प्रतिवादी क्र.१ च्या आईने प्रतिवादी क्र.१ यास कोणतेही खरेदी खत करून दिल्याबाबतचा मजकूर खोटा व खोडसाळ आहे. प्रतिवादी क्र.१ ने जो दस्त हजर केला आहे तो त्याच्या आईने स्वत:च्या मर्जीने, विचाराने लिहून दिलेला नाही व त्यावरील सह्या/अंगठे देखील वादीच्या आईचे नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. येणेप्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांचा अर्ज व वादीचे म्हणणे पाहता या अर्जाच्या गुणदोषावर न्यायनिर्णय होण्यासाठी पुढील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसहीत खालीप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तुत अर्जातील प्रस्तावीत दुरुस्ती दावा व प्रतिदाव्याच्या गुणदोषावर निकालासाठी आवश्यक असल्याचे प्रतिवादी क्र.१ शाबीत करतात का ? | होकारार्थी ...... |
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजुर करण्यात येतो.... |

**कारणमीमांसा**

**मुद्दा क्र. १ व २ करीता :-**

५. मुळ वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरूध्द दावा मिळकतीमध्ये वादीचा १/२८ इतका हिस्सा असल्याचे घोषीत होवून मिळावे व स्वतंत्र कब्जा तुटक वाटप होवून मिळावा आणि दावा मिळकत मौजे नांदगाव खुर्द, ता.चिपळूण येथील गट क्र.१४३ मध्ये प्रतिवादी क्र.१ यांनी स्वत:च्या मर्जीने सुरु केलेले बांधकाम त्वरीत थांबवण्यासाठी निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांची कैफियत व प्रतिदावा नि.३१ कडे दाखल केला असून सदर दावा मिळकती वडीलोपार्जीत असल्याचे मान्य केले आहे. दि.०५.०२.२०२५ रोजी प्रतिवादी क्र.३ चंद्रभागा शंकर सावर्डेकर यांनी मौजे नांदगाव खुर्द येथील गट क्र.१४३ क्षेत्र हे ०.२२ आर अधिक पोटखराब ०.०४ आर एकूण हे ०.२६ आर आकार रु.०.११ पैसे पैकी १/२८ हिश्याची म्हणजेच हे ०.०.९२ आर मिळकत रक्कम ₹५०,०००/- मात्र यास प्रतिवादी क्र.१ यास नोंदणीकृत खरेदीखत क्र.६४३/२०२५ ने विक्री केल्याचे दिसून येते. म्हणून प्रतिवादी क्र.१ कैफियत व प्रतिदावा नि.३१ मधील परिच्छेद क्र.८ मध्ये सदर खरेदीखताच्या अनुषंगाने दुरुस्ती सुचवू पाहात आहेत. दाव्याची चौकशी अद्यापही सुरू झालेली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ सुचवू पाहत असलेली दुरूस्ती दाव्याचा व प्रतिदाव्याचा गुणदोषावर न्यायनिर्णय करण्यासाठी आवश्यक आहे. वादीने सदर खरेदीखताबाबत अद्यापही कोणती दाद मागीतलेली नाही. म्हणून वादीस प्रतिवादी क्र.१ ने कैफियत व प्रतिदावा नि.३१ मध्ये सदरची दुरूस्ती केल्यानंतर देखील रिजॉइंडर दाखल करता येवू शकते. याउलट प्रतिवादी क्र.१ यांचा अर्ज नामंजुर केल्यास वादी व प्रतिवादींचे हिस्से ठरवण्यामध्ये अडचणी येणार आहेत. त्या

टाळण्यासाठी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून क्र.२ करीता पुढील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र.१ यांचा नि.१०३ कडील अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ यांनी सदर दुरुस्ती कैफियत व प्रतिदाव्यामध्ये आजपासून १४ दिवसांच्या आत करावी व दुरुस्त कैफियत व प्रतिदाव्याची प्रत अभिलेखावर सादर करावी.

सही/–

(वाय.सी. पाटील)
सह दिवाणी न्यायालय क. स्तर,
चिपळूण.

ठिकाण – चिपळूण.
दिनांक – २८/०१/२०२६.

**- प्रमाणपत्र -**

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ आदेशामधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | एम.इ.आरेकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| **न्यायालयाचे नाव** | **सह दिवाणी न्यायालय क.स्तर, चिपळूण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी.** |
| आदेश घोषीत दिनांक | २८.०१.२०२६ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | २८.०१.२०२६ |
| आदेश अपलोड केलेले दिनांक | २९.०१.२०२६ |